Vijay Uppani

## || हरि ॐ ||

# प. पू. सद्गुरु श्रीअनिरुध्द चिन्मय पादूका पुजन

1. प्रथम पूजनाला बसणाऱ्या व्यक्तिने / दांपत्याने स्वतःच्या घरातील देवांची नेहमीप्रमाणे पूजा करावी व कुलदेवतेस नमस्कार करावा.

2. पादूकांच्या समोर बसुन प्रथम पुढील श्लोक म्हणावेत.

वक्रतुंड महाकाय सुर्यकोटी सम्प्रभ ।
निर्विघ्नं कुरु मे देव शुभकार्येषु सर्वदा ॥

सर्वमंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके ।
शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोऽस्तुते ॥

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णू गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुर्साक्षात परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥

3. नंतर एका सुंगधीत फुलाने पादूकांभोवती हलकेच पाणी तीनवेळा शिंपडावे व जलसिंचन करताना—

स्वागतं श्रीअनिरुध्द सुस्वागतम् ॥ (3 वेळा म्हणावे)

4. पादूकांना अष्टगंध लावावे व अक्षता वहाव्यात. नंतर स्वतःच्या मस्तकावर अष्टगंध व अक्षता लावाव्यात व पत्नीच्या मस्तकी कुंकू व अक्षता लावाव्यात.

5. एका ताम्हणात दोन देवांच्या विड्याच्या पानांवर सुपारी ठेवून त्यास पत्नीने पंचामृताचा अभिषेक करावा. अभिषेक करताना 'श्रीअनिरुध्द कवच' म्हणावे. हे तिर्थ म्हणून सर्वांस पूजेनंतर द्यावे. त्यातील पाने व सुपारी काढून नंतर जलात विसर्जन करावे.

6. नंतर पादूकांस सुगंधीत फुले व हार अर्पण करावा.

7. समई किंवा दिप प्रज्वलीत करावा व त्यास हळद, कुंकू व अक्षता वहाव्यात, सुगंधीत उदबत्त्या लावाव्यात.

8. पादूकांस अत्तर लावणे व पादूकांवर मस्तक ठेवून नमस्कार करावा.

Generated by CamScanner from intsig.com

Scanned with CamScanner

9. समोर बसून हात जोडून प. पू. बापूंचा 'ध्यानमंत्र' म्हणावा.

ध्यानमंत्र

पद्मासिनम् श्यामवर्णम् सहस्रशीर्षम् शुभांगम् ।
सहस्त्राक्षम् सर्वरुपम् मनःसामर्थ्यदायकम् ।
पापतापहरम् शांतम् अभयमुद्राधारिणम् ।
भक्तप्रियम् सौम्यरुपम् अनिरुध्दम् नमाम्यहम् ।।

10. नंतर दोघांनीही पादुकांस तुळशीपत्रे अर्पण करताना...

ॐ नमो भगवते श्रीकृष्णाय अनिरुध्दाय नमो नमः ।।

—हा जप 84 वेळा करावा.

11. नंतर पादुकांस बिल्वपत्रे अर्पण करताना...

ॐ त्रिपुरारि अनिरुध्दाय नमः ।।

—हा जप 84 वेळा करावा.

12. नंतर साष्टांग नमस्कार घालावा व स्वतःभोवती तीन प्रदक्षिणा घालाव्यात.

13. नंतर प. पू. श्री अनिरुध्दांस नैवेद्य दाखवावा ज्यामध्ये 'लोणी, साखर व केशरी पाणी' आवश्यक आहे.

14. नंतर पादुकांपुढे दोन देठांची विड्याची पाने, एक सुपारी व सव्वा रुपया ठेवून त्यांवर हळद-कुंकू वहावे.

15. आरती करावी.

16. मंत्रपुष्पांजली म्हणून फुले अर्पण करावी (मंत्रपुष्पांजली येत नसेल तर 'गुरुर्ब्रह्मा....' हा श्लोक 12 वेळा म्हणावा).

16-A ———— अनिरुध्द चालिसा (5 वेळा)

17. 'गजर'.

Generated by CamScanner from intsig.com

Scanned with CamScanner